9 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

अर्जुन टाकळकर



सेवानिवृत्तीनिमित्त प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा सपत्नीक सत्कार करताना कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे आणि अनिता शिंदे. यावेळी प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मानसिंग बोंद्रे, प्र-कुलगुरू डी. टी. शिर्के, विजय बोंद्रे, प्राचार्य एकनाथ काटकर, प्राचार्य पी. आर. शेवाळे, डॉ. राजेखान शानेदिवाण, बाबासाहेब पाटील-भुयेकर, बाबासाहेब पाटील-आसुर्लेकर आदी.

# प्राचार्य मोरे कुशल प्रशासक

**सत्कारप्रसंगी कुलगुरु डॉ. शिंदे यांचे प्रतिपादन**

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी ३८ वर्षाच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय क्षेत्रात काम करताना कुशल प्रशासक म्हणून छाप उमटविली. त्यांनी प्राचार्य ते प्रभारी कुलगुरुपर्यंच्या प्रत्येक टप्प्यावर उच्च शिक्षणासह विद्यापीठाच्या शैक्षणिक व्यवस्थेला धोरणात्मक दिशा देण्याचे मोठे काम केले. विद्यापीठाच्या अर्थसंकल्पपासून शैक्षणिक धोरणापर्यंत त्यांचा ठसा राहिला' असे गौरवोद्गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले. प्राचार्य डॉ. मोरे यांचा निवृत्तीनिमित्त सत्कार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

कुलगुरू शिंदे यांच्या हस्ते प्राचार्य मोरे व अनिता शिंदे यांच्या हस्ते गायत्री मोरे यांचा सत्कार झाला. अंबाबाईची मूर्ती, मानपत्र, मानचिन्ह, आणि शाल श्रीफळ देऊन हा सत्कार झाला. विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते डॉ. मोरे यांच्या आजवरच्या वाटचालीवर आधारित प्रेरणा गौरव अंकाचे प्रकाशन झाले. शहाजी कॉलेज येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात रविवारी सायंकाळी झालेल्या कार्यक्रमास शाहू शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, सचिव विजय बोंद्रे उपस्थित होते.

कुलगुरू शिंदे म्हणाले, 'सकारात्मक आक्रमकता, विवेकी विचार, कायद्याचा अभ्यास आणि संस्कारशील वर्तणूक ही त्यांची स्वभाववैशिष्ट्ये मला भावली. मोरे हे सहकारी असले तरी त्यांच्याकडे मी ज्येष्ठ या नात्याने पाहतो. गेल्या दोन वर्षात त्यांच्यामध्ये आणि माझ्यामध्ये जिव्हाळ्याचे संबंध निर्माण झाले. मोरे यांनी सकारात्मक वृत्तीने प्रत्येक घटकाचे काम कायद्याच्या चौकटीत बसवून केल्यामुळे वादाचे प्रसंग टाळले.'

प्राचार्य मोरे यांनी सत्काराला उत्तर देताना, शहाजी कॉलेज ही माझी संस्था आणि या संस्थेने मला मोठे केले. येथून पुढेही शिक्षण क्षेत्रात कार्यरत राहणार असल्याचे सांगितले.

प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य मंगलकुमार पाटील, प्राचार्य नागेश नलवडे, प्रा. डी. एन. पंगू, प्रा. बी. बी. पाटील, प्रा. नीता धुमाळ, प्रा. शर्मिला गौरव मोरे, गौरव अंकाचे संपादक डॉ. राजेखान शानेदिवाण यांची भाषणे झाली. शहाजी कॉलेजचे प्राचार्य एकनाथ काटकर यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य पी. आर. शेवाळे यांनी स्वागत केले.

**राजकीय हस्तक्षेप नाही**

'औरंगाबाद विद्यापीठासह पुणे, मुंबई विद्यापीठ येथेही काम केले. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे मतप्रवाह असतात. मात्र शिवाजी विद्यापीठात कसलाही राजकीय हस्तक्षेप होत नाही. यामुळे या विद्यापीठाचा कुलगुरू होणे हा जीवनातील मोठा सत्कार आहे' अशी भावना कुलगुरू डॉ. शिंदे यांनी भाषणात व्यक्त केली.

**अभेद्य जोडी**

'कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे आणि प्राचार्य डी. आर. मोरे हे दोघे म्हणजे विद्यापीठ प्रशासनातील राम - लक्ष्मणची जोडी आहे. प्राचार्य मोरे यांनी अधिसभेवर, बीसीयूडी, प्रभारी कुलगुरुपदी शैक्षणिक संस्थांना पाठबळ दिले' अशा शब्दात प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी मोरे यांच्या कामाविषयी कौतुकोद्गार काढले.

9 OCT 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

लोकमत

# 'डी. आर. मोरे' एक संयमी कोल्हापूरकर

## देवानंद शिंदे : सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार, 'प्रेरणा' गौरव अंकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क




कोल्हापुरात रविवारी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या हस्ते मानपत्र देऊन प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांचा सेवागौरव करण्यात आला. यावेळी डावीकडून अभयकुमार साळुंखे, मानसिंग बोंद्रे, डी. टी. शिर्के, विजय बोंद्रे, गायत्री मोरे, अनिता शिंदे, एकनाथ काटकर, आदी उपस्थित होते.

कोल्हापूर : आक्रमक स्वभावाला विवेकाची जोड देऊन डॉ. डी. आर. मोरे यांनी शिक्षण क्षेत्रात यशस्वी वाटचाल केली. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये एका संयमी, विवेकी कोल्हापूरकराचे दर्शन मला घडते, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी रविवारी येथे केले.

प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे सेवागौरव समारंभ आणि प्रेरणा गौरव अंकाच्या प्रकाशन कार्यक्रमात ते बोलत होते. शहाजी महाविद्यालय परिसरातील यशवंतराव चव्हाण सभागृहातील कार्यक्रमास विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे मानद सचिव विजय बोंद्रे, चेअरमन मानसिंग बोंद्रे प्रमुख उपस्थित होते. प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे गौरव समितीतर्फे हा कार्यक्रम आयोजित केला होता. कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, विद्यापीठ आणि कोल्हापूरकडून मला डॉ. मोरे यांच्यासारखा एक ज्येष्ठ मित्र मिळाला. अर्थसंकल्प, विविध अभ्यासक्रमांची सुरुवात, आदींबाबत विद्यापीठाला धोरणात्मक दिशा देण्यात त्यांचे मोठे योगदान राहिले आहे. प्राचार्य डॉ. साळुंखे म्हणाले, विद्यापीठ, शहाजी महाविद्यालयात त्यांनी प्रशासक म्हणून उत्तम काम केले आहे. कुलगुरु डॉ. शिंदे यांच्या हस्ते डॉ. मोरे यांचा अंबाबाईची प्रतिमा आणि मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन, तर अनिता शिंदे यांच्या हस्ते गायत्री मोरे यांचा सत्कार केला. प्राचार्य डॉ. साळुंखे यांच्या हस्ते 'प्रेरणा' अंकाचे प्रकाशन झाले. बी. बी. पाटील, नीता धुमाळ, मंगलकुमार पाटील, नागेश नलवडे, डी. एन. पंगू, क्रांतिकुमार पाटील, शर्मिला मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, के. ए. कापसे, बाबासाहेब पाटील, बाबा सावंत, सुरेश कुऱ्हाडे, एस. पी. चौगुले, पंडित बोंद्रे, अरुण चोपदार, आदी उपस्थित होते. डॉ. पी. आर. शेवाळे यांनी स्वागत केले. शहाजी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य एकनाथ काटकर यांनी प्रास्ताविक, डॉ. राजेखान शानेदिवाण यांनी मानपत्र वाचन, पंढरीनाथ पाटील यांनी सूत्रसंचालन, तर बाबासाहेब पाटील यांनी आभार मानले.

### चांगल्यासाठी कार्यरत राहिलो

आयुष्यात कुणाला अडकविण्याचे काम केले नाही. चांगल्यासाठी कार्यरत राहिलो. कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडली. अनेक अडचणींतून शांतपणे मार्ग, तोडगा काढून यशस्वीपणे वाटचाल केली, असे प्राचार्य डॉ. मोरे यांनी सत्काराला उत्तर देताना सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017
पुण्यनगरी



कोल्हापूर : प्राचार्य डी. आर. मोरे यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, मानसिंग बोंद्रे आदी. (छाया : एस. अली)

# डॉ. डी. आर. मोरे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व

## कुलगुरू डॉ. शिंदे

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिक्षण क्षेत्रामध्ये विविध पदांची जबाबदारी यशस्वीपणे पार पडत असताना प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांनी अनेक विद्यार्थी घडवले. हे विद्यार्थी सध्या अनेक उच्च पदांवर काम करत आहेत, डॉ. मोरे यांच्या व्यक्तिमत्त्वापासून प्रेरणा घेऊनच या विद्यार्थ्यांना यश मिळाले, असे उद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले, माजी बीसीयूडी संचालक आणि शहाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डी. आर. मोरे यांच्या सेवानिवृत्तीनिमित्त आयोजित सत्कार आणि त्यांच्या जीवनावरील 'प्रेरणा' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ते बोलत होते. डॉ. मोरे आणि त्यांच्या पत्नी गायत्री मोरे यांचा सत्कार करण्यात आला.

कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, मोरे यांनी प्रशासनात आपला ठसा उमटविला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू आहेत, त्यामुळेच ते नेहमी लोक जोडत गेले. प्रशासनाचा कौशल्यपूर्ण वापर करण्याचा त्यांचा गुण वाखाणण्याजोगा आहे. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, प्रशासन सांभाळताना आवश्यक असणारी सकारात्मकता आणि प्रसंगी कठोर निर्णय घेण्याची धमक मोरे यांच्यामध्ये होती. त्यांनी आपल्या कार्यकाळात प्रशासनामध्ये सुरळीतपणा आणला. ते चांगले शिक्षक आणि उत्तम प्रशासक आहेत.

सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे म्हणाले, प्रशासन सांभाळताना नेहमीच लोकहिताचा विचार केला. नियम आणि कायदे हे लोकांसाठी आहेत, हे मानूनच काम केले. प्रत्येकाच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा नेहमीच प्रयत्न करत होतो. प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते 'प्रेरणा' या गौरव अंकाचे प्रकाशन करण्यात आले. डी. बी. पाटील, नीता धुमाळ, प्रा. मंगलकुमार पाटील, प्राचार्य नागेश नलावडे, प्रा. डी. एन. पंगु, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, प्रा. शर्मिला मोरे आदींनी मनोगत व्यक्त केले. अनिता देवानंद शिंदे, श्री छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्र. कुलगुरू डी. टी. शिर्के, मानद सचिव विजयराव बोंद्रे, गौरव समितीचे अध्यक्ष प्राचार्य एकनाथ काटकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. सूत्रसंचालन पंढरीनाथ पाटील यांनी केले. पी. आर. शेवाळे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017
Times of India

# 'Awareness needed on restoration of flora and fauna'

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** A biodiversity awareness workshop was conducted at Shivaji University, Kolhapur (SUK) by the department of zoology, in association with the Maharashtra State Biodiversity Board to spread awareness among students.

Several members associated with the biodiversity board were present for the event.

In his speech Vilas Bardekar, chairman of Maharashtra State Biodiversity Board, said that we need sustainable efforts, which in the long turn will help humans sustain a healthy life.

Bardekar also said that we need mass awareness on restoration of local flora and fauna.




"Most of it is used and destroyed in the name of tradition and culture," he said.

He further said that the ancient knowledge of herbs needs to be conserved as it is as important as new medicines.

Bardekar said that SUK's premises is full of biodiversity and due to the heavy presence of butterflies in the campus, one could easily call it a butterfly park.

D T Shirke, pro-vice-chancellor of SUK, said that

TOI



inclusion of locals for preservation of biodiversity is very important. He also said, we can gather more information from locals about the variety of plants and animals.

He added that it is everyone's responsibility to preserve the SUK's diverse culture.

**Organ donation drive at SUK:** City based civil hospital, Chhatrapati Pramila Raje Rugnalay (CPR) in association with Shivaji University, Kolhapur (SUK) organised an organ donation awareness drive on the university campus on October 4.

CPR dean Jayprakash Ramanand attended the event, along with other SUK officials. A poster presentation competition was held as well.

9 OCT 2017
सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शेअर बाजाराचा अभ्यास करा

## वृशाली कर्णे : शेअर बाजारातील गुंतवणूक लाभदायक

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ८ : "शेअर बाजारातील तंत्र नियम, अटी समजून घेऊन केलेली गुंतवणूक पारदर्शक, दिशादर्शक व फायदेशीर ठरू शकते, अशा गुंतवणूक साक्षरतेचे प्रमाण वाढले पाहिजे, त्यासाठी शेअर बाजारातील व्यवहारांची पुरेशी माहिती करून घेत गुंतवणूक वाढविल्यास चांगला नफा कमावता येणेही शक्य आहे," असे मत नॅशनल स्टॉक एक्स्चेंज इन्व्हेस्टर प्रोटेक्शनच्या प्रतिनिधी वृशाली कर्णे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र अधिविभाग व कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएसनतर्फे 'शेअर बाजारातील गुंतवणूक' या विषयावर मार्गदर्शन मेळावा झाला, या वेळी त्या बोलत होत्या. श्रीमती कर्णे म्हणाल्या, "देशातील दोन टक्के लोक गुंतवणूक करतात. योग्य ती काळजी घेऊन नियम अटी समजून घेऊन म्युचअल फंडातील केलेली गुंतवणूक नवख्या ग्राहकांसाठी उपयुक्त ठरू शकते वेगवेगळ्या सुरक्षेच्या चौकटीतही गुंतवणूक करता येते, जितक्या कमी वयात शेअर बाजारातील गुंतवणूक कराल तितका भविष्यात लाभ मिळण्याचे प्रमाण अधिक असेल."

अर्थशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. विजय ककडे म्हणाले, "गुंतवणूक साक्षरता वाढीसाठी शिवाजी विद्यापीठाने पाऊल उचलेले असून, शेअर बाजारातील व्यवहाराची माहिती देणारा अभ्यासक्रम लवकरच सुरू होत आहे. कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन व नॅशनल स्टॉक एक्सचेंज यांच्यात गुंतवणुकीचा मार्गदर्शनविषयक उपक्रम राबविण्यासाठी लवकरच सामंजस्य करारही होणार आहे."

नॅशनल स्टॉक एक्सेंजच्या प्रतिनिधी प्रीती गुप्ता यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी उपाध्यक्ष नितीन ओसवाल, सहसचिव बिपीन दावडा, सचिव राजीव शहा, अशोक पोतनीस, संदीप अथणे, प्रवीण ओसवाल, मनीष झंवर आदी उपस्थित होते.




**कोल्हापूर : कोल्हापूर इन्व्हेस्टर असोसिएशन व शिवाजी विद्यापीठातर्फे 'शेअर बाजारातील गुंतवणूक' विषयावर शनिवारी बोलताना वृशाली कर्णे. शेजारी नितीन ओसवाल, बिपीन दावडा, राजीव शहा, डॉ. विजय ककडे आदी.** (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

### श्रीमती कर्णे यांनी दिलेल्या टिप्स

- नोंदणीकृत ब्रोकरशीच व्यवहार करा
- स्टॉक ब्रोकर सेबीकडे नोंदणीकृत असल्याची खात्री करा
- तुम्ही तुमचे खाते स्वतः चालवा
- नुकसानीचा अंदाज घेऊनच गुंतवणूक करा
- वटमुक्त्यार पत्रातील तरतुदी समजून घ्या
- ब्रॉकरला रोख रक्कम न देता धनादेश द्या
- ऑनलाईन व्यवहारात पासवर्ड, लॉगिन सांगू नका

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- 9 OCT 2017
तरूण भारत

# विद्यापीठात ८ नोव्हेंबरपासून राज्यस्तरीय चर्चासत्र

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील कै. शारदाबाई गोविंदराव पवार अध्यासनाच्यावतीने ८ व ९ नोव्हेंबर रोजी कोल्हापुरातील कर्तृत्ववान स्त्रिया या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. चर्चासत्रात ६० निमंत्रित अभ्यासकांचा समावेश असून सहभागी अभ्यासक आपले शोधनिबंध सादर करतील.यावर चर्चासत्रात सविस्तर चर्चा होणार आहे. त्यामुळे अभ्यासकांनी शोधनिबंधात आवश्यक ते बदल करून ते अध्यासनाकडे जमा करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच संबंधित शोधनिबंधाचे पुस्तक अध्यासनाच्यावतीने प्रकाशित करण्यात येणार आहे. दरम्यान, या चर्चासत्रात डॉ. अशोक चौसाळकर, अरूण भोसले, प्रकाश पवार, राजन गवस, प्राचार्य दिनकर पाटील, विलास पवार, अरूण भोसले, रणधीर शिंदे, तृप्ती करिकटी, राजश्री बार्वेकर, पदमा पाटील, विद्या कटी व अविनाश पाटील सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017

महाराष्ट्र टाईम्स

# 'विद्यार्थ्यांमध्ये संवादाची गरज'

**कोल्हापूर :** 'संयम आणि सहिष्णुता या गुणांची आजच्या सामाजिक सदृढतेसाठी फार मोठी आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांमध्ये आंतरसांस्कृतिक संवादाची आवश्यकता आहे', असे प्रतिपादन धारवाड विद्यापीठ येथील मराठी विभागाचे प्रमुख व लेखक डॉ. अमृत यार्दी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इंग्रजी अधिविभागात शिक्षक दिन आणि लेखक आपल्या भेटीस असा संयुक्त उपक्रम घेण्यात आला. त्यावेळी डॉ. यार्दी बोलत होते. अध्यक्षस्थानी इंग्रजी अधिविभागाचे प्रमुख डॉ. सी. ए. लंगरे उपस्थित होते. आधुनिक काळातील शिक्षकांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाबददल डॉ. यार्दी यांनी सविस्तर चर्चा केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017
सकाळ




कोल्हापूर : बहाई अकादमीतर्फे प्रा. डॉ. रूपा शहा यांचा सन्मान करताना डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जानकर, डॉ. माणिकराव साळुंखे, डॉ. राम ताकवले, लेसन आझादी.

# बहाई अकादमीकडून प्रा. डॉ. रूपा शहा यांचा सन्मान

कोल्हापूर, ता. ८ : बहाई अकादमी संस्थेकडून प्रा. डॉ. रूपा शहा यांना रिसर्च गाईड ऑफ द बहाई अकादमी म्हणून मान्यता दिली. अकादमीचे पाचगणी (जि. सातारा) येथे केंद्र आहे. केंद्राचा ३५ वा वर्धापनदिन साजरा झाला. यामध्ये मानवी मूल्यांच्या शिक्षणाची आवश्यकता, पद्धती आणि उपक्रमाबाबत मान्यवरांना चर्चेसाठी निमंत्रित केले होते. भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. राम ताकवले, आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. जानकर, शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डिसोझा, बहाईचे संचालक लेसन आझादी यांच्या उपस्थितीत प्रा. डॉ. शहा यांना गौरविले. प्रा. डॉ. शहा यांनी अकादमीचे तीन प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण केले. तसेच छात्रसैनिकांसाठी पाचगणीत कार्यशाळा घेतली. यासाठी अकादमीने त्यांना रिसर्च गाईड म्हणून मान्यता देण्याचा निर्णय घेतला होता.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठात प्लेसमेंट ड्राइव्ह

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या संगणकशास्त्र अधिविभागामध्ये पुणे येथील रिअल सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजी यांच्यातर्फे प्लेसमेंट ड्राईव्ह घेण्यात आले.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा घेण्यात आली. या परीक्षेमध्ये विशेष कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांची मुलाखत घेण्यात आली. संगणकशास्त्र अधिविभागातील प्रियांका महावीर पाटील (एमसीए) व ऐश्वर्या अजित राऊत (एमएस्सी) या दोन विद्यार्थिनींची निवड करण्यात आली. प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये दीडशे विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. आयोजन संगणकशास्त्र अधिविभागाचे विभागप्रमुख डॉ. आर. के. कामत यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. यू. आर. पोळ यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 OCT 2017
लोकमत

## परीक्षा नियोजन कार्यशाळा उत्साहात

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण केंद्रामध्ये चालू शैक्षणिक वर्षामधील पदवी व पदव्युत्तर प्रवेश प्रक्रियेमध्ये ऑक्टोबर / नोव्हेंबर २०१७ च्या परीक्षेचे विद्यार्थ्यांचे हॉल तिकीट, प्रश्नपत्रिकेचे वितरण व परीक्षा केंद्रावरील परीक्षेचे नियोजन करण्याच्या दृष्टीने अभ्यासकेंद्रावर कार्यरत असणारे समन्वयक यांची कार्यशाळा पार पडली. विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यशाळा झाली. अध्यक्षस्थानी दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. एम. ए. अनुसे होते.